मेहकर-सुलतानपूर रस्त्याची दयनीय अवस्था - प्रवाशांचे जीव धोक्यात! >> पान 2

राज्यात कडवट हिंदुत्ववादी सरकार : नितेश राणे >> पान 3

४० लाखांच्या मुद्देमालासह चार चोरट्यांच्या आवळल्या मुसक्या >> पान 4

**सुविचार**

देवाला कोणताच धर्म नसतो.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



मातृभाषा संवर्धनाच्या मुद्द्यावर सोनाली कुलकर्णी स्पष्टच बोलली आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 209 ■ बुधवार, दि. 12 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांवर होणार कारवाई

## मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत निर्गमित केल्या सूचना; आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन झाल्यास कारवाई

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : राज्यातल्या प्रार्थनास्थळावरच्या भोंग्यावर आता सरकारची करडी नजर असणार आहे. जो कुणी ५५ डेसिबलच्या नियमांचं उल्लंघन करणार त्याची परवानगी कायमसाठी रद्द करण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. प्रार्थनास्थळावरील भोंग्यांच्या आवाजाची तीव्रता तपासण्याचं काम हे पोलिस निरीक्षकाचं असून त्याची माहिती त्यांनी प्रदूषण नियंत्रण बोर्डला देणं गरजेचं आहे असं फडणवीस म्हणाले.



राज्यातील प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांच्या आवाजाबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यावर आज विधानसभेत प्रश्न विचारण्यात आला. उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कायद्यानुसार, अधिक डेसिबलने हे भोंगे वाजत असतील तर प्रदूषण नियमक मंडळ कारवाई करतं. कुणालाही सरसकट भोंग्याची परवानगी देणार नाही. निश्रि्चत कालावधीसाठी परवानगी दिली जाईल.



त्यानंतर जर पुन्हा कुणाला परवानगी हवी असेल तर ती पोलिसांकडून नव्याने घ्यावी लागेल.

देवेंद्र फडणवसी म्हणाले की, राज्यात जर कुणी ५५ डेसिबल आणि ४५ डेसिबलचे उल्लंघन केले जाईल त्याला पुन्हा कधीच परवानगी दिली जाणार नाही. भोंग्यांची जप्ती केली जाईल. याचे तंतोतंत पालन होत आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी ही पोलिस निरीक्षकांची असेल. >> पान २

## विठ्ठलाच्या मूर्तीवर लवकरच इपॉक्सी लेप, मंदिर समितीच्या सहअध्यक्षांची माहिती



**दैनिक आपला विदर्भ**

पंढरपूर /प्रतिनिधी : विठोबाच्या मूर्तीची झीज भरून काढण्यासाठी मूर्तीवर इपॉक्सी लेप लावावा. असा निर्णय परत होणार आहे. विठ्ठलाच्या मूर्तीच्या पायावर, तसेच इतर ठिकाणी मूर्तीची झीज झाल्याचे पुरातत्व विभागाच्या निरीक्षणातून पुढे आले आहे. त्यामुळे विठ्ठलाच्या मूर्तीची झीज थांबवण्यासाठी मूर्तीवर लवकरच रासायनिक प्रक्रिया केली जाणार आहे.

## विठाई प्रतिष्ठान तर्फे जिद्द धर्मवीर आनंद दिघे शाळेत इको फ्रेंडली रंगांनी विद्यार्थांनी साजरी केली होळी

**दैनिक आपला विदर्भ**

ठाणे /प्रतिनिधी : जिद्द धर्मवीर आनंद दिघे शाळा या ठिकाणी विठाई प्रतिष्ठान आणि विजू माने आयोजित विशेष शाळेत, विशेष होळी चे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी इको फ्रेंडली रंगानी होळी खेळून मराठी, हिंदी गाण्यावर खूप मजा केली. अभिजीत कमलाकर चव्हाण- अध्यक्ष, विठाई सामाजिक संस्था, जिद्द शाळेतील विदयार्थी, शिक्षक आणि स्वप्नील भांगरे यांच्या हस्ते होळीचे दहन करून पारंपरिक पद्धतीने देवाला गाऱ्हाणे घालून सर्वांनी सुखी ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. अभिजीत चव्हाण यांनी शाळा प्रशासन व विजू माने यांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला. यावेळी शाळेतील मुलांनी एकमेकांना रंग लावत गाण्यावर ठेका धरत नाच केला.

## पांढऱ्याशुभ्र गाठ्यांसह रंगीत गाठ्यांनी बाजारपेठ सजली, बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी : होळी म्हटलं तर पांढऱ्याशुभ्र गोड गाठीशिवाय ते अपूर्णच असते. होळीला पूरणपोळी, रंग, गुलाल, पिचकारीचे जेवढ महत्त्वं आहे तेवढंच गाठीचाही मान असतो. नववधू विवाहानंतर वधूमंडळी नव वरास गाठीची भेट देण्याची परंपरा आहे. तसेच शेजाऱ्यांना, नातेवाईकांना पांढऱ्याशुभ्र गाठी आवर्जून दिल्या जातात. होळी निमित्त गाठी घालून मिरवण्याची बच्चेमंडळीना खूप हौस असते. त्यामुळे होळीला घरोघरी गाठीची खरेदी होतेच. बाजारात या साखरेच्या गाठी दाखल झाल्या असून १६० रु. किलो ने विकल्या जात आहे. गेल्या वर्षीपेक्षा चांगली मागणी असल्याचे व्यापाऱ्यांनी म्हटले आहे. सर्वच गोष्टींच्या किंमती वाढल्या असून ग्राहकांचा देखील उत्तम प्रतिसाद असल्याचे व्यापाऱ्यांनी म्हंटले आहे.

## छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून विधानभवनात अभिवादन



**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : विधानभवनात छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पणन मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री पंकज भोयर, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री योगेश कदम, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह विधिमंडळ सदस्य, वरिष्ठ अधिकारी यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

## तब्बल ३३० लाख कोटी रुपयांची राखरांगोळी; आर्थिक मंदीचे संकेत मिळताच शेअर बाजारात शुकशुकाट, गुंतवणूदारांना फटका

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : कैक दिवसांपासून जागतिक स्तरावर आर्थिक मंदीचे अनेक संकेत मिळत असतानात आता शेअर बाजारातील उलथापालथीमुळे पुन्हा एकदा सारं जग आर्थिक संकटाच्या गर्त छायेत बुडणार असल्याचं म्हटलं जात आहे. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयातशुल्कात (टॅरिफ) वाढ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता गुंतवणुकदारांना धक्का बसला आहे. इतकंच नव्हे तर, खुद्द ट्रम्प यांनाच त्यांच्या या निर्णयाचा फटका बसत असल्याची वस्तुस्थिती सध्या नाकारता येत नाही. गेल्या तीन आठवड्यांपासून सातत्यानं शेअर बाजारात सुरू असणारी पडझड आता गंभीर वळणावर पोहोचली असून, टॅरिफ पॉलिसीमध्ये असणाऱ्या अनिश्चिततेमुळं जागतिक आर्थिक मंदीची शक्यता वाढली आहे. खुद्द ट्रम्प यांनीही या शक्यतेला दुजोरा दिल्यामुळं अमेरिकेतील शेअर बाजार धाडकन कोसळला. इथं डाऊ जोंसपासून एसअँडपीपर्यंत बऱ्याच इंडेक्सचं अस्तित्वं धोक्यात आलं. म

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी ११ महिने

मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना पाच महिन्याची सरकारने मुदतवाढ दिली आहे. आता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील युवकांना एकूण ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षण घेता येईल. सध्या जे १ लाख १० हजार प्रशिक्षणार्थी ज्या पदावर कार्यरत आहेत. त्यांना पाच महिन्यांची मुदत वाढ देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात जाहीर केलं होतं. त्यानंतर या योजनेसंदर्भातील नवा जीआर प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामध्ये यापुढील कालावधीसाठी मुदतवाढ दिली जाणार नाही असं स्पष्ट करण्यात आलं आहे. ज्यांचं सहा महिन्यांचं कार्य प्रशिक्षण पूर्ण झालंय त्यांना आणखी ५ महिने प्रशिक्षण घेता येईल. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींच्या गेल्या काही दिवसापासून सुरू असलेल्या लढ्याला यश मिळाल्याचं पाहायला मिळालं..

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या १० मार्चच्या जीआरमध्ये काय म्हटलं?

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणाचा कालावधी ११ महिने करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तुत योजनेंतर्गत सद्यस्थितीत जे उमेदवार कार्यप्रशिक्षण घेत आहेत, त्यांचा कार्यप्रशिक्षण कालावधी ते रुजू झाल्याच्या दिनांकापासून ११ महिने असा असेल. तसेच, ज्या उमेदवारांचा ६ महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी यापूर्वीच पूर्ण झाला आहे, अशा उमेदवारांना पुढील ५ महिन्याच्या प्रशिक्षणासाठी संबंधित आस्थापनेत रुजू होता येईल. उमेदवारांना संबंधित आस्थापनेत पुन्हा रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ महिन्याच्या कालावधीसाठी कार्यप्रशिक्षण अनुज्ञेय असेल.

## प्रख्यात डॉक्टरचे महिलेशी अश्लिल चाळे; व्हिडिओ व्हायरल होताच डॉक्टर फरार, बुलढाण्यात एकच खळबळ

**दैनिक आपला विदर्भ**

बुलढाणा/प्रतिनिधी : बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहरातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात एका प्रख्यात वैद्यकीय व्यावसायिकाचा एका महिलेशी अश्लील चाळे करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. हा व्हिडिओ जवळपास पाच महिन्यापूर्वीचा असल्याचं बोललं जातंय. चिखली शहरातील एका नामांकित रुग्णालयाच्या डॉक्टरने आपल्याच केबिनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले असताना महिलेशी अील चाळे करताना या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. हा व्हिडिओ आता दोन दिवसापासून चिखली शहर व परिसरात वायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

### महिलेच्या नातेवाईकांनी दिला डॉक्टरला चोप

दरम्यान, याबाबत अद्याप पोलिसात कुठेही तक्रार दाखल झाली नसून रुग्णालयात काम करणाऱ्या व व्हिडिओ व्हायरल झालेल्या म हिलेच्या नातेवाईकांनी डॉक्टरच्या रुग्णालयात जाऊन गोंधळ घातल्याचं समोर आलं आहे. संबंधित डॉक्टर रुग्णालयाला कुलूप ठोकून फरार झालेला आहे. त्यामुळे या प्रकरणी पुढे नेमकी काय कारवाई केली जाते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# ‘आनंदाचा शिधा योजना’ अखेर बंद

**दैनिक आपला विदर्भ**




मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील गरिबांसाठी सणासुदीच्या दिवसात आधार असणारी आनंदाचा शिधा योजना अखेर बंद करण्यात आली आहे. राज्यातील निवडणुकीच्या आधी राज्य सरकारने काही महत्त्वाच्या योजना लागू केल्या होत्या. त्यात आनंदाचा शिधा या योजनेचाही समावेश होता. या योजनेचा फायदा राज्यातील जवळपास १ कोटी ६३ लाख लाभार्थींना झाला होता. आता ही योजना बंद करण्याचा निर्णय झाला आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीनंतर आनंदाची शिधा, तीर्थाटन योजना अशा काही योजना सरकारकडून बंद करण्यात येणार असल्याची चर्चा सुरू होती. त्यातील आनंदाची शिधा योजना आता बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मागील महायुती सरकारकडून अनेक योजनांच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. सोमवारी सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात अनेक योजनांना निधीचं वाटप करण्यात आलं आहे. त्यामध्ये आनंदाचा शिधा आणि इतर काही योजनांच्या निधीबाबत कुठेही भाष्य करण्यात आले नाही. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना आनंदाचा शिधा ही योजना लागू करण्यात आली होती. राज्यातील विविध सणाच्या निमित्ताने या योजनेत लाभार्थींना अवघ्या १०० रुपयांत पाच वस्तू घरपोच मिळत होत्या. त्यामुळे किमान काही अंशी दिलासा गरिबांना मिळत होता. आता मात्र ही योजना बंद करण्यात आली आहे.

ही योजना का बंद झाली, याबाबत अद्याप कोणतेही स्पष्ट कारण देण्यात आले नाही. राज्याच्या तिजोरीवरील वाढता भार कमी करण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला असल्याची चर्चा आहे. ही योजना बंद झाल्याने गरजू लाभार्थ्यांना धक्का बसला आहे. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर मोठा भार येत आहे. त्यामुळे सरकारकडून विविध योजनांच्या निधीत कपात करण्यात येत आहे. लाडकी बहीण योजनेमुळे ही योजना बंद झाली का, याची चर्चा सुरू झाली आहे.राज्य सरकारची लोकप्रिय योजना आंनदाचा शिधा अखेर बंद करण्यात आली आहे.

## महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए – एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्रीपदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

# मेहकर–सुलतानपूर रस्त्याची दयनीय अवस्था – प्रवाशांचे जीव धोक्यात!



**दैनिक आपला विदर्भ**

**■ अबुतालीब खान**

**सुलतानपूर :** शेगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील मेहकर ते सुलतानपूर हा रस्ता काही वर्षांपूर्वीच नव्याने तयार करण्यात आला होता. मात्र, अल्पावधीतच या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. अतिशय निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, संपूर्ण रस्ता भेगांनी भरलेला आहे.

या रस्त्यावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने प्रवाशांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहनचालकांसाठी हा रस्ता जीवघेणा ठरत असून, अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. मात्र, संबंधित अधिकारी केवळ मलमपट्टी करून जबाबदारी झटकत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिक नागरिक आणि प्रवासी यांनी यावर त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर योग्य ती दखल घेऊन या रस्त्याची डागडुजी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जनतेने दिला आहे.

# परदेशात उच्च शिक्षणासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागाचे पाठबळ

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज प्रक्रिया सुरु; ३० एप्रिलपर्यंत अर्ज मागविले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यास आर्थिक मदत मिळावी यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना ३० एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही योजना २००३ पासून सुरू असून, याद्वारे प्रतीवर्षी ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. यामध्ये पदव्युत्तर पदवी व संशोधनात्मक अभ्यासक्रम (पीएच. डी.) यासाठी मदत मिळते. यंदाही अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने अर्ज दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये पहिल्या २०० क्रमांकात असणाऱ्या परदेशातील






शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक खर्चासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. यात शिक्षण शुल्क, विमान प्रवास खर्च, निर्वाह भत्ता आणि आकस्मिक खर्च याचा समावेश आहे. योजनेतील ३०% जागा गुणवत्तेनुसार मुलींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**येथे करा अर्ज :** विद्यार्थ्यांनी अर्ज शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावा. त्यानंतर, अर्ज व आवश्यक कागदपत्रे https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन सादर करावीत. ऑनलाइन अर्जाची प्रत काढून, ती आवश्यक कागदपत्रांसह समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे ऑफलाइन सादर करणे अनिवार्य आहे. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल आहे.

**पात्रता व अटी :** अर्जदार हा अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे, तर पीएच. डी. साठी ४० वर्षे असेल. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावर नमूद असलेले एमडी व एमएस अभ्यासक्रमच पात्र ठरतील.

या योजनेचा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. तसेच अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शासनाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आवाहन भाऊराव चव्हाण यांनी केले आहे.

पान १ वरून...

## प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांवर होणार कारवाई

पोलिस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थनास्थळाला भेट देऊन तपासणी करावी. त्यासाठी प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये मीटर देण्यात आलं आहे. त्यानंतर जर कुणी उल्लंघन केलं जात असेल तर त्याची माहिती पहिला प्रदूषण नियंत्रण बोर्डला दिली पाहिजे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अशा भोंग्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही. केंद्रीय कायद्यानुसार प्रदूषण बोर्डने ही कारवाई करण्याची जबाबदारी आहे. या संबंधी नियमांमध्ये काही बदल करण्यासाठी केंद्रालाही विनंती करण्यात येईल असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

जो काही नियम आहे त्याचे पालन होते की नाही हे पाहण्याची जबाबदारी ही त्या ठिकाणच्या पोलिस निरीक्षकाची आहे. त्याने जर काम केलं नाही तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

मशिदींवरील भोंग्यावर कारवाई करण्यात यावी अशी याआधी अनेकदा मागणी करण्यात आली आहे. त्यावर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आवाज उठवला होता. त्यानंतर काही प्रमाणात भोंग्यावर कारवाई करण्यात आली होती. पण नंतर पुन्हा एकदा ही कारवाई थंडावल्याचं दिसून आलं.

## मातृभाषा संवर्धनाच्या मुद्द्यावर सोनाली कुलकर्णी स्पष्टच बोलली

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी आणि अभिनयातील वेगळ्या निवडींसाठी ओळखली जाते. नुकतंच आलेल्या 'उप्स... अब क्या?' या वेब सीरिजमध्ये तिने विनोदी भूमिका साकारली, आणि त्यानिमित्ताने 'मटा कट्टा'वर विनोदाच्या बदलत्या स्वरूपावर मत मांडताना, सध्याच्या संवेदनशील परिस्थितीवर तिने परखड भाष्य केलं.

विनोदाची मर्यादा आणि सध्याची परिस्थिती

सोनालीच्या मते, आज विनोदाच्या नावाखाली हातघाईला आल्यासारखं वागलं जातं. सुचलेलं वाक्य एका श्र्वासात बोललं जातं आणि त्याचे दूरगामी परिणाम होतात. पूर्वी विनोद हा लोकांना हसवण्यासाठी असायचा, पण आता त्याचा हेतू बदलतोय. विनोद प्रसिद्धी मिळवण्यासाठी, कोणाला तरी दुखावण्यासाठी किंवा चर्चेत राहण्यासाठी केला जातो. त्यामुळे लेखक आणि कलाकारांनी जबाबदारीनं काम करणं गरजेचं आहे.

# होळीसाठी शेणाच्या गोवऱ्यांना मागणी

## आधुनिक काळात पारंपरिक महत्त्व कायम

फाल्गुन पौर्णिमेला संपूर्ण देशात साजरा होणारा होळी उत्सव विविध भागात विविध नावाने ओळखला जातो. अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरा, विचार यांचे होळीमध्ये दहन करावे आणि सकारात्मक सकारात्मक ऊर्जा घेत जीवन जगावे, यासाठी संपूर्ण भारतभर होळी हा सण साजरा केला जातो. या होळी मध्ये जाळण्यासाठी धार्मिक व वैज्ञानिक महत्त्व असलेल्या गाईच्या शेणापासून तयार करण्यात आलेल्या गोवऱ्याची मागणी आधुनिक काळातही कायम आहे.होळी हा केवळ रंगांचा सण नाही. तर, तो वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतिक आहे. या दिवशी होलिका दहनाची परंपरा आहे.

होळी हा सण प्रेमाचा रंगाचा सण म्हणून साजरा केला जातो. त्याचबरोबर होळीमध्ये अनिष्ट प्रथांना जाळून टाकून सकारात्मक ऊर्जा घेत जीवनाला प्रारंभ करण्यात येतो. होळीमध्ये वृक्ष गोवऱ्या जाळण्याची प्रथा आहे. ग्रामीण भागात होळीच्या पंधरा दिवसापूर्वी गाईच्या गोवऱ्यापासून चाकोल्या तयार करून त्याची माळ तयार करून त्या गोवऱ्या, चाकोल्या होळीमध्ये जाळल्या जातात. हिंदू धर्मग्रंथांनुसार, गायीमध्ये ३३ कोटी





### चाकोल्यांचा वापर केल्यास वृक्षतोड थांबवण्यास मदत होईल

होळीनिमित्त शेणापासून गोवऱ्या, चाकोल्या बनवण्यात येत आहेत.होळीमध्ये पेटवण्यासाठी गायीच्या शेणापासून गोवऱ्या, चाकोल्यांना विशेष मागणी आहे.गायीच्या शेणापासून तयार केल्या जाणाऱ्या गोवऱ्या, चाकोल्यांचा होळीत वापर होतो वर्ध्यात पीपल फॉर निमल्सच्या करुणाश्रमातही गोवऱ्या, चाकोल्यांची निर्मिती केली जात आहे. चाकोल्यांची तयार केली जाते माळ. शेणापासून निर्मित गोवऱ्या, चाकोल्यांचा वापर केल्यास वृक्षतोड थांबवण्यास मदत होऊन पर्यावरण संवर्धनास हातभार लागेल.

**–आशिष गोस्वामी,**
**सचिव, पीपल फॉर निमल्स, पिपरी (मेघे)**

देवी–देवता निवास करतात. म्हणून, गायीचे शेण अत्यंत शुभ आणि शुद्ध मानले जाते. होलिका दहनात जेव्हा शेणाच्या गोवऱ्या जाळल्या जातात. तेव्हा ते संपूर्ण कुटुंबासाठी शुभ मानले जाते. होलिका दहनाच्या वेळी शेणाच्या गोवऱ्या जाळल्याने व्यक्तीच्या जीवनातील सर्व अडथळे दूर होतात असे मानले जाते. यामुळे घरात आणि कुटुंबात आनंद, समृद्धी आणि शांती मिळते. ज्योतिषशास्त्रानुसार, शेणाच्या गोवऱ्या जाळल्याने शनि आणि राहू–केतूचे अशुभ प्रभाव कमी होतात. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, शेणात असे नैसर्गिक घटक असतात जे पर्यावरणातील हानिकारक जीवाणू आणि विषारी कण नष्ट करण्यास सक्षम असतात. जेव्हा गाईचे शेण जाळले जाते तेव्हा ते हवा शुद्ध करते आणि पर्यावरणासाठी फायदेशीर असते.लाकूड जाळण्याच्या तुलनेत शेणामुळे कार्बन उत्सर्जन कमी होते. ज्यामुळे प्रदूषण देखील कमी होते. त्यामुळे ते पर्यावरणपूरक देखील आहे.होळीच्या काही दिवस आधी, महिला शेणाच्या लहान गौवऱ्या बनवतात आणि उन्हात वाळवतात. या शेणाच्या गोवऱ्यांना दोऱ्यावर बांधून माळा बनवली जाते. होलिका दहनाच्या आधी, ही माळ कुटुंबातील सदस्यांवर फिरवून वाईट नजर दूर केली जाते. यानंतर ही माळा होलिकेच्या अग्नीला समर्पित केली जाते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सिलेंडरच्या स्फोटाने देवळाई परिसर हादरला, पाच दुकाने जळून खाक



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** देवळाई परिसरात पाच दुकानांना भीषण आग लागली व त्यातच गॅस सिलेंडरच्या स्फोटामुळे परिसर हादरून गेला. सर्व दुकाने दुचाकी व सायकल जळून खाक झाली यात सिलेंडरच्या स्फोटामुळे परिसरात मोठा स्फोट झाला होता की सिलेंडर हवेत उडाले. आगीच्या धुराचे लोट आकाशात दिसत होते प्रामुख्याने दूध डेअरी,चपला व फळ विक्री फेब्रिकेशन,गादी,घर आणि पिठाची गिरणी होती. शॉर्टसर्किट होऊन आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक अधिकारी गाडीसहदाखलझाले आणि आग आटोक्यात आणली.

### चिल्लर माणूस पोलिसांना सापडत नाही हे दुर्दैव ; इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांची नाराजी



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर /प्रतिनिधी :** एका चिल्लर माणूस पोलिसांना सापडत नाही, आपले पोलीस तर इतके असक्षम आहे का? असा प्रश्न इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी उपस्थित करून पोलीस प्रशासनाप्रती नाराजी व्यक्त केली. यावेळी ते बोलताना म्हणाले की, अड्.असीम सरोदे यांनी उच्च न्यायालयात आमची बाजू मांडली होती. हा विषय केवळ माझा नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या बद्दल जे घाणेरडी वक्तव्य करण्यात आली त्याबद्दलच आहेत. महाराष्ट्रातील व्यक्ती अशी वक्तव्य करतो आणि लपून राहतो.त्याने वक्तव्य केला नसेल तर तो लपून राहिला नसता. प्रशांत कोरटकर यांनी मोबाईल पोलिसांना दिला. मात्र, सर्व डेटा इरेज करून दिला यातूनच समजायला हवं. गेले आठ ते दहा दिवस झालं एका चिल्लर माणूस पोलिसांना सापडत नाही, आपले पोलीस तर इतके असक्षम आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री शिवप्रेमी आहेत. काल त्यांनी अनेक घोषणा केलेले आहेत. मात्र, ज्याने इतके घाणेरडे वक्तव्य केले त्यावर कारवाई करायला हवे. म्हातारी गेल्याचं दु:ख नाही मात्र, काळ सोखवता कामा नये.जरी हे प्रकरण न्यायालयात असलं तरी कशा पद्धतीने कारवाई करता येते हे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना माहित आहे ते त्यांनी करावे. असे मत इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या भोंगळ कारभाराविरोधात वेताळ बांबर्डे ग्रामस्थ आक्रमक




दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग /प्रतिनिधी :** जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा भोंगळ व बेजबाबदार कारभाराविरोधात निषेध म्हणून कुडाळ तालुक्यातील वेताळ बांबर्डे येथील ग्रामस्थांनी उपोषण छेडले आहे. वेताळ बांबर्डे गावातील जलजीवन मिशनच्या अंतर्गत पाण्याच्या योजनांसाठी ठेकेदारास कार्यारंभ आदेश देऊन दोन वर्ष कालावधी उलटून गेला तरी ठेकेदाराकडून चारही योजनांच्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली नसल्याने गावात योजनेची अंमलबजावणी होऊ शकली नाही, असे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

# राज्यात कडवट हिंदुत्ववादी सरकार : नितेश राणे

दैनिक आपला विदर्भ



**रत्नागिरी /प्रतिनिधी :** आज धर्म रक्षण दिनाच्या निमित्ताने आपण इथे जमलो आहोत.माजी आमदार प्रमोद जठार यांचं मनापासून अभिनंदन, कारण त्यांनी हे भगवं वादळ निर्माण केले. या व्यासपीठावर एक हिंदू म्हणून आम्ही इथे उपस्थित आहोत. स्मारकासाठी आमच्या हिंदुत्ववादी सरकारने तरतूद केली आहे. राज्यात कडवट हिंदुत्ववादी सरकार आहे. असे मत मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केले ते धर्मरक्षण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, इथे भव्य स्मारक उभारून दाखवू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे मनापासून धन्यवाद मानतो.येणाऱ्या काही वर्षांत आमच्या राजाचे भव्य स्मारक इथे उभं करू, ज्या राजामुळे आज आम्ही हिंदू म्हणून ओळख सांगतो.संभाजी राजे नसते तर आपल्या आडनावाच्या पुढे वेगळच नाव लागले असते.

शिवाजी महाराजांच्या सैन्यात कोणी मुसलमान नव्हते. हिंदू विरुद्ध मुसलमान अशीच लढाई होती. काही अतिशहाने सांगतात कधी महाराजांनी मस्जिद तोडली नाही. ज्यांनी ज्यांनी स्वराज्याकडे वाकड्या नजरेने पाहिलं त्यांना महाराजांनी धडा शिकवला. आज कडवड हिंदुत्ववादी सरकार राज्यात आहे. औरंगजेबाची कबर आहे, ती घाण आम्हाला नको, सरकारच्या प्रमुखांची तीच मानसिकता आहे. कब कबर निकालांगे सांगणार नाही. जास्त कोणालाही माहिती देणार नाही, जे ठरलंय ते होणार आहे. एक दिवशी औरंग्याच्या कबरीचा कार्यक्रम होणार आहे. पोलिसांचं संरक्षण जेवढे वाढेल तेवढा कार्यक्रम चांगला होईल. माझ्या राजाचे औरंग्याने हाल केले पण धर्म बदलला नाही. तुम्ही सर्वांनी शपथ घेतली पाहिजे. भगवा आपल्या हृदयात, नसा नसात असला पाहिजे. बाकीचे पाणी घेताना खाज येत नाही.आमच्या श्रद्धेचा विषय आहे, मग सर्वच धर्मांना बोलून दाखवा.स्मारकासाठी त्या कुटुंबाला जो मान सन्मान द्यायचा आहे.तो देऊ, निधी कमी पडू दिला जाणार नाही. असे मत मंत्री नितेश राणे यांनी बोलताना व्यक्त केले.

## नालेसफाई बाबतची कामे होत नसल्याने शिवसेना ठाकरे पक्ष आक्रमक

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईत ठिकठिकाणी नालेसफाईला सुरुवात झाली असली तरी चांदिवली विभागात मात्र महत्त्वाचा असलेला सफेद पुलचा नाला कचऱ्याने खचाखच भरला आहे. या ठिकाणी नाल्याचे दुरुस्ती काम झाले आहे. मात्र, या नाल्यातील जलवाहिनी कचऱ्याला अडसर ठरत आहेत, नालेसफाई करण्यास पुरेशी जागा ठेवण्यात आली नाही. योग्य पद्धतीने नालेसफाई बाबतची कामे होत नसल्याने शिवसेना ठाकरे पक्ष आक्रमक झाला आहे. आज शिवसेना ठाकरे पक्ष विभाग प्रमुख सोमनाथ सांगळे यांच्या नेतृत्वात या नाल्यांवर मोर्चा काढत पाहणी करण्यात आली. या वेळी पालिका प्रशासनाचा जोरदार निषेध करण्यात आला. पालिकेच्या भोंगळ कारभाराने या विभागाला पावसाळ्यात मोठा फटका बसणार आहे, या बाबत वारंवार तक्रारी करून ही उपाययोजना होत नाहीत, दोन दिवसात ही कामे झाली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना ठाकरे पक्षाचे विभाग प्रमुख सोमनाथ सांगळे यांनी दिला.

## बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजागार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. २४ ते २८ मार्च २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे.

या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. २४ मार्चपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/ ९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

## सांगलीच्या शिराळामधील भुईकोट किल्ल्यावर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची रेखाटण्यात आली भव्य रांगोळी



दैनिक आपला विदर्भ

**सांगली /प्रतिनिधी :** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनाच्या निमित्ताने शिराळा भुईकोट किल्ला येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या भव्य अशा सात हजार स्क्वेअर फुटाच्या रांगोळीचा लोकार्पण सोहळा आज संपन्न झाला.आज ११ पासून १६ मार्च पर्यत रांगोळी सर्वांच्यासाठी पाहण्यास खुली राहणार आहे.

शिराळा येथील भुईकोट किल्ल्यास ऐतिहासिक महत्त्व आहे. याच ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांना सोडवण्याचा एकमेव प्रयत्न झाला. या ठिकाणी संभाजी महाराज यांचे भव्य स्मारक महायुती सरकारच्या माध्यमातून आमदार सत्यजित देशमुख यांच्या प्रयत्नातून मार्गी लागेल. शिराळासह व शिराळा पंचक्रोशितील हजारो मावळ्यांची व जनतेची ही मागणी पूर्ण होईल. शिराळ्यातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यावरती भव्य दिव्य रांगोळी रेखाटण्यात आली आहे. अशा पद्धतीने शिराळा व सांगली जिल्ह्यात पहिल्यांदाच ही रांगोळी रेखाटण्यात आली आहे. ही रांगोळी कांदे येथील रांगोळी कलाकार सुनील कुंभार यांनी रेखाटली आहे. आज ११ पासून १६ मार्च पर्यत रांगोळी सर्वांच्यासाठी पाहण्यास खुली राहणार आहे.तरी याचा लाभ घ्यावा सर्वांनी घ्यावा असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

ही रांगोळी सात हजार सात हजार स्क्वेअर फुटाची असून त्यासाठी सुमारे दीड टन रांगोळीचा वापर करण्यात आला आहे.यासाठी मला ३५ तास लागले असून १८ प्रकारच्या रंगाचा वापर करण्यात आला आहे.

## रस्ता ओलांडताना सिमेंट बल्करच्या धडकेत महिलेचा मृत्यू ; सोलापूर येथील घटना

दैनिक आपला विदर्भ



**सोलापूर /प्रतिनिधी :** रस्ता ओलांडताना सिमेंट बल्करच्या धडकेत एका महिलेचा मृत्यू झाला. सदर घटना अक्कलकोट-सोलापूर रोडवरील मल्लिकार्जुन नगर परिसरात ११ मार्च रोजी घडली. प्राप्त माहितीनुसार ५५ वर्षीय महिला रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगाने येणाऱ्या सिमेंट बल्करने त्या महिलेला धडक दिली. या धडकेत सदर महिलेचा जागीच मृत्यू झाल. मृत महिलेची अद्याप ओळख पटली नसून घटनास्थळावर पोलीस दाखल झाले होते.अपघातनंतर बल्कर चालक हा गाडीसह घटनास्थळावरून पळून गेलेला चालक एमआयडीसी पोलीस स्टेशनला शरण आल्याची माहिती आहे. मृतदेह हे शवविच्छेदनासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयाकडे रवाना करण्यात आला आहे. सोलापुरात बल्कर वाहनाच्या धडकेत काही दिवसापूर्वी असाच भीषण अपघात झाला होता, त्यानंतर पुन्हा एकदा अपघाताची घटना घडली असल्याची माहिती माजी नगरसेवक तथा आरोग्यदूत बाबा मिस्त्री यांनी दिली

# आमदार धस यांच्या आरोपात काही तथ्य नाही

## धनंजय मुंडे यांचे भाऊ अजय मुंडे यांची पत्रकार परिषदेत टीका

दैनिक आपला विदर्भ



**बीड /प्रतिनिधी :** मागील दोन दिवसांपूर्वी आमदार सुरेश धस यांची मुलाखत पहिली. त्यात धनंजय मुंडे यांच्या आई बद्दल बोलत आहेत. आमच्या बाई परळीला राहत होत्या. त्यांचे चुलत भाऊ नाराज आहेत. कौटुंबिक कलह असल्याचा आरोप केला आहे.धनंजय मुंडे त्यांच्या आई सोबतच राहतात. धस यांच्या आरोपाला अर्थ नाही. आमदार सुरेश धस यांनी मनात आले ते बोलू नये, असे मत धनंजय मुंडे यांचे भाऊ अजय मुंडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त करत आमदार धस यांनी केलेल्या आरोपाबाबत नाराजी व्यक्त करून धस यांच्या आरोपात कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले.

यावेळी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, आमच्या बाई त्याच्या विषयी जे बोलले गेले. किती दिवस गप्प बसायचे. देशमुख यांच्या प्रकारात न्याय मिळाला पाहिजे, धनंजय मुंडे नेतृत्व व्हायला २० वर्ष झाले. त्याच्यावर आरोप नसताना त्यांना बदनाम केले जात आहे. ते अनेक आजाराला सामोरे जात आहेत. आम्ही कुटुंब नाराज नाही. आमच्या घराचे काम सुरू आहे. गावाला जाऊन राहणे गुन्हा आहे का? मुंडे देखील तिथेच राहतात. धनंजय मुंडे यांचे मित्र नाही, धस वक्तव्य,धस यांचा जावई शोधा. संतोष देशमुख यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यामुळे आम्ही बोलत नाही. सुरेश धस किती धुतल्या तांदळाचे हे माहीत आहेत. सुरेश धसांना खोक्या प्रकरणातसह आरोपी केले पाहिजे, आमच्यावर आता कौटुंबिक आरोप केले जात आहेत.

मात्र त्याला काही अर्थ नाही. कोणी तरी बोलले पाहिजे म्हणून मी इथे बोलायला आलो आहे. आरोप पत्र आम्ही पूर्ण वाचले नाही. जे आरोपी आहेत त्यांना कडक शासन झाले पाहिजे, ही आमची मागणी आहे. धनंजय मुंडे यांना बदनाम केले जात आहे. जी घटना झाली दुर्दैवी आहे.मात्र, नाहक बदनामी सुरू आहे. सुरेश धस यांनी पुरावे दिले पाहिजे, टिपरबाबत त्यांनी सीआर बुक ची मागणी केली पाहिजे, आज कुटुंबावर आले म्हणून पुढे येऊन बोलत आहोत. माज्या मोठ्या बहीण भावा बद्दल बोलण संयुक्तिक वाटत नाही. असे मत धनंजय मुंडे यांचे भाऊ अजय मुंडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### शुक्रवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे शुक्रवारी नेत्र, मतिमंद, कान, नाक व घसा संबधित दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र शुक्रवार, दि. १४ मार्च रोजी धूलिवंदन निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.

### उपोषणकर्त्यांसाठी जागा निश्चित

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालय तसेच विविध शासकीय कार्यालयासमोर उपोषणकर्ते वारंवार रस्त्याच्या बाजुला किंवा फुटपाथवर मंडप टाकुन उपोषणास बसतात. त्यामुळे रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण होतो. असे प्रकार टाळण्यासाठी नगर परिषद यांनी उपोषण करण्याची जागा निश्र्चित करण्यात आली आहे. त्यानुसार उपोषणकर्त्यांनी येथील जिजामाता प्रेक्षगार समोरील मोकळी जागेत उपोषण करावे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी दिली.

### कापूस खरेदीसाठी शेतकऱ्यांनी १५ मार्चपर्यंत नोंदणी करावी



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय कापूस निगमच्या शासकीय कापूस खरेदी योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी दि.१५ मार्च पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, चालू हंगाम २०२४-२५ ऑक्टोबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ मध्ये किमान आधारभूत किमंतीवर (एमएसपी) कापूस विक्री करण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी आगाऊ किंवा जागेवर नोंदणी करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. १५ मार्च पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

### कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा जिल्हा दौरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे पाटील (राज्यमंत्री दर्जा) हे मंगळवार दि. ११ मार्च २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार अमरावती येथून दुपारी ३.३० वाजता कोलोरी ता. खामगाव जि. बुलढाणा येथील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. सायंकाळी ४ वाजता निमकवळा ता. खामगावकडे प्रयान. सायंकाळी ४.३० वाजता निमकवळा येथे आगमन व एमआरइजीएस अंतर्गत चारा लागवड पाहणी. सायंकाळी ५.१५ वाजता निमकवळा येथुन बुलढाणाकडे प्रयान करतील. सायंकाळी ६ वाजता विश्रामभवन बुलढाणा येथे आगमन व राखीव.

दि. १२ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता विश्रामभवन येथुन सावळा ता. बुलढाणाकडे प्रयान. सकाळी १०.१५ वाजता सावळा येथील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. सकाळी ११ वाजता सावळा येथुन उंद्री-लाखनवाडा-जानेफळ-मेहकर मार्गे व तामसी ता. वाशीमकडे प्रयान करतील.

### सोमवारी महिला लोकशाही दिन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने मार्च महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १७ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.



# ४० लाखांच्या मुद्देमालासह चार चोरट्यांच्या आवळल्या मुसक्या

## एक जेसीबी, दोन ट्रॅक्टर व ७ मोटारसायकली जप्त

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशिम/प्रतिनिधी :** विविध गुन्ह्यातील चार आरोपींच्या मुसक्या आवळून वाशिम शहर पोलिसांनी एक जेसीबी, दोन ट्रॅक्टर, पाच मोटरसायकल असा तब्बल ४० लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर घटनेबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार वाशीम शहर पोलीस स्टेशन येथे ३ लाख ५० हजार रुपये किंमतीचा जॉन डिअर कंपनीचा ट्रक्टर ट्रालीसह चोरी गेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच ८ लाख रुपये किंमतीचे महिंद्रा कंपनीचा अर्जुन ट्रक्टर व ट्राली, ४० हजार रुपये किंमतीची स्पेल्डर मोटार सायकल चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर गुन्ह्याचा तपास वाशीम शहर येथील स्थनिक गुन्हे शाखा पथकाने पोलीस निरिक्षक यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे तांत्रिक पध्दतीने व गोपनीय यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीवरुन केला. तसेच ट्रक्टर ज्या दिशेने गेले त्या भागात जावून माहिती घेतली असता आरोपी सुखदेव ऊर्फ संचीत उत्तम गायकवाड वय २८, नामदेव उत्तम गायकवाड वय २४ दोघेही रा. करंजी ता. महागांव जि. यवतमाळ व ज्ञानेश्र्वर बंडु कछवे वय २४ रा. ब्राम्हणवाडा ता. जि. वाशीम तसेच महादेव बबन पाटील वय २३ रा. हॅपी फेसेस शाळे जवळ वाशीम यांना अटक करुन आरोपीची चौकशी करून विविध गुन्ह्यातील तब्बल ४० लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. यामध्ये ३ लाख ५० हजार रुपये किंमतीचे जॉन डिअर कंपनीचा ट्रक्टर ट्राली, ८ लाख रुपये किंमतीचा महिंद्रा कंपनीचा अर्जुन ट्रक्टर व ट्राली, ४० हजार रुपये किंमीची एक स्पेल्डर मोटार सायकल, ६० हजार रुपये किंमतीची एक होंडा शाईन मोटार सायकल चोरी झाल्या बाबत वसंतनगर जि. यवतमाळ येथील पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच २४ लाख रुपये किंमतीची जेसीबी आरोपींनी मुर्तीजापूर येथून डिसेंबर २०२४ मध्ये चोरल्याचे तपासात निषन्न झाले असून त्या अनुषंगाने मुर्तीजापूर येथे गुन्हा दाखल आहे. तसेच मंगरुळपीर पोलीस स्टेशन हद्दीतून ४० हजार रुपये किंमतीची एक स्पेल्डर मोटार सायकल, रुपये किंमतीची महागांव जि. यवतमाळ पोलीस स्टेशन हद्दीमधुन चोरली व आरोपींच्या ताब्यात दोन लाख ५० हजार रुपये किंमतीच्या विना कागदपत्राच्या दोन बुलेट मोटार सायकल असा एकूण ४० लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. वाशीम शहर पोलिसांची कामगिरी ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती लता फड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नवदिप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, साहहायक पोउपनि निलेश जाधव, एएसआय कैलास कोकाटे, एएसआय लालमणी श्रीवास्तव, पोलीस कर्मचारी प्रशांत वाढणकर, शैलेंद्रसिंह ठाकुर, अष्टसिध्द नप्ते, गजानन काळे, शब्बीर गौरवे, उमेश देशमुख, महादेव भिमटे, संदिप दुतोंडे, कोरडे, हरीष गावंडे, सोनुने व त्याचे पथकाने केली आहे.

## अपूर्ण पाणी टाकीचे कामे पूर्ण करून गावाला पाणी पुरवठा करा

### परसोडी गावकऱ्यांची मागणी



**दैनिक आपला विदर्भ**

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्याच्या देवरी तालुक्याअंतर्गत येणाऱ्या परसोडी गावात जल जीवन मिशन योजने अंतर्गत लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या पाणी टाकीचे अपूर्ण काम विधीत कालावधीत पूर्ण करून गावकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यात यावे या मागणीला घेऊन परसोडी ग्राम वासियांनी जिल्हाधिकऱ्यांना निवदेन दिले आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागा मार्फत जल जीवन मिशनची कामे करण्यात येत असून, देवरी तालुक्याच्या परसोडी गावात देखील वर्ष २०२२ मध्ये जल जीवन योजने अंतर्गत हर घर नल हर घर जल पोहोचविण्याच्या उद्देशाने गावात तीन हजार लिटर क्षमतेच्या पाणी टाकीचे बांधकाम सुरु झाले. हे कामे ३१ मार्च २०२४ पूर्वी पूर्ण करणे गरजेचे होते. मात्र मार्च २०२५ सुरु झाला असून, ही योजना पूर्णत्वास आली नाही. त्यामुळे परसोडी ग्राम वासियांनी या संदर्भात जिल्हाधिकर्यांना निवेदन देत पाणी टाकीचे अपूर्ण कामे पूर्ण करून देण्याची विनंती केली आहे. येत्या आठ दिवसात अपूर्ण पाणी टाकीचे कामे सुरु झाले नाही तर रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशारा परसोडी ग्राम वासियांनी जिल्हाधिकऱ्याना निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे. तर ही परिस्थिती एकट्या परसोडी गावातील नसून जिल्ह्यात इतर गावातही जल जीवन योजनेचे मागील दोन वर्षापासून कामे सुरु असून, पूर्णत्वास न आल्याने याही उन्हाळ्यात गावकऱ्यांना पाणी टंचाई चा सामना करावा लागेल. त्यामुळे स्वतः जिल्हाधिकरी या विषया कडे लक्ष देऊन गावकऱ्यांना पाणी टंचाई पासून मुक्तता मिळवून देतील का? हे पाहण्यासारखे असेल.

## नंदुरबार बाजार समितीमध्ये दोन लाख क्विंटल मिरचीची आवक

### गेल्या वर्षीची तुलनेत यावर्षी ४० टक्क्यांनी मिरची आवक घटली

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार बाजार समितीत मिरचीच्या हंगाम शेवटच्या टप्प्यात आला असून, आतापर्यंत दोन लाख क्विंटल मिरचीची आवक बाजार समितीत झाली आहे.



गेल्या वर्षीचे तुलनेत तब्बल ४०% ने मिरचीचे उत्पादन घटले आहे. गेल्या वर्षी सरासरी ३ लाख ३५ हजार क्विंटल मिरचीची आवक आली होती, मात्र यावर्षी २ लाख क्विंटल मिरचीची आवक असल्याने दीड लाख क्विंटल मिरचीची आवक घटली आहे. मात्र मिरचीची आवक घटली असली तरी देखील मिरचीला समाधानकारक असा भाव मिळालेला नाही. गेल्या वर्षीची मिरची व्यापाऱ्यांनी साठवणूक केल्यामुळे यावर्षी मिरचीला २ हजार पासून ते ४ हजार पर्यंतच्या दर मिळाला होता, मात्र आता मिरचीच्या हंगाम अवघ्या काही दिवस उरला आहेत. नंदुरबार जिल्हा हा मिरचीच्या आगार म्हणून ओळखला जातो, मात्र यावर्षी मिरचीच्या उत्पादनात प्रचंड घट पाहायला मिळाली आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेस १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. योजनेंतर्गत यापुर्वी दिलेल्या मुदतीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी १५ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे स्विकारण्यात आलेले आहेत. मात्र अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत. योजनाचे ऑनलाईन अर्ज भरण्याची व भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक सर्व कागदपत्रांसह जमा करण्याची मुदत १५ जानेवारीपर्यंत होती. तथापि योजनेची व्याप्ती तालुका स्तरापर्यंत असल्यामुळे विहित मुदतीत अनेक विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नाहीत. त्यामुळे शासनाने १५ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे. बँक तपशिलही विद्यार्थ्यांनी द्यावा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज यापुर्वी अनेक विद्यार्थ्यांनी भरले आहेत, त्यांनी सुध्दा बँक तपशिल भरण्यासाठी विद्यार्थी लॉगीनमध्ये नवीन टॅब उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी बँक तपशिल भरुन अर्ज करावा. अन्यथा सदर योजनेचा लाभ दिल्या जाणार नाही, यांची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांना अर्जाची सद्य:स्थिती त्यांच्या लॉगीनमध्ये आयडी व पासवर्ड वापरुन पाहता येणार आहे.

## अवैध स्ट्रोन क्रेशर बंद करा; शेतकरी, विद्यार्थ्यांसह अनेकांची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अशोक मुंढे**

**महारचिकना :** बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तहसील अंतर्गत मौजे किनगाव जटटू गावाला लागूनच श्री संत गजानन महाराज पालखी मार्गावर बिबी ते किनगाव जटटू रस्त्याच्या बाजूलाच अनेक वर्षे पासून अवैध स्ट्रोन क्रेशर गिट्टी खदानी सुरू आहेत याकडे संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते आहे.

अनेक लेखी तक्रारी होऊन सुद्धा यावर कारवाई होतांना दिसत नाही स्ट्रोन क्रेशर च्या धुळीमुळे अनेक शेतकऱ्यांची पिके उध्दवस्त होत आहेत स्ट्रोन क्रेशर बाजूला हाकेच्या अंतरावर शाळा आहे या शाळेत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असुन स्ट्रोन क्रेशर च्या धुळीमुळे व डांबराच्या कारखान्यातुन निघणाऱ्या धुरा मुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असुन संबंधित विभाग मात्र अवैध स्ट्रोन क्रेशर वाल्यांना पाठीशी घालत आहे या ठिकाणी खदान व क्रेशर मुळे नैसर्गिक पर्यावरण रक्षणासाठी प्रदूषण, सार्वजनिक ,आरोग्य ,व दळणवळणास धोका निर्माण झाला आहे तसेच वन्यजीव याचे मुलस्थान अतिक्रमित केले आहे तसेच क्रेशर व खदान दगड क्रशिंगमुळे आजुबाजुच्या जागेस व गावकऱ्यांचे विस्तार हक्कास बाधा निर्माण झाला आहे याठिकाणी बोअर ब्लास्टिंग होत असुन आजुबाजुच्या घराला तडे गेले आहेत अवैध पणे कोरलेल्या खदानाचे मोजमाप करावे यासाठी लेखी तक्रारी सुद्धा दिल्या आहेत.



खदान मालकांनी लिहून दिलेल्या अटी शर्तीचे खुलेआम उल्लंघन होत असुन सुद्धा अवैध पणे चालणार्या खदानीला संबंधित यंत्रणा पाठीशी घालत असुन आतातरी जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार यांनी कारवाई करावी अशी मागणी सातत्याने होत आहे.